ठाणे शहर

ठाणे शहर पोलीस शिपाई भरती २०१९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वैद्यकिय चाचणी

अंतिम तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांपैकी वैद्यकिय चाचणीसाठी पात्र ठरलेल्या ०५ उमेदवारांकरीता सूचना

- खालील यादीतील नमूद ०५ उमेदवारांची वैद्यकिय चाचणी **सोमवार,दि.२०/०६/२०२२ रोजी** जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे करण्यात येणार आहे. खालील **नमूद उमेदवारांनी वैद्यकिय चाचणीच्या दिवशी सकाळी ठिक ०६:३० वाजता पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयातील आस्थापना शाखेत उपस्थित रहावे.**
- वैद्यकिय तपासणी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार करण्यात येईल.
- वैद्यकिय चाचणीत १.दृष्टीदोष, २.तिरळेपणा, ३.रातआंधळेपणा, ४.वर्णांधळेपणा, ५.गुडघ्यास गुडघा लागणे, ६.सपाट तळवे, ७.त्वचारोग, ८.छातीचे रोग, ९.तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असून या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- उमेदवाराने वैद्यकिय चाचणीच्या दिनांकास व वेळेत न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. उमेदवार वैद्यकिय चाचणीसाठी गैरहजर राहिल्यास कोणतीही सूचना न देता त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- वैद्यकिय चाचणीस येताना अलिकडील कालावधीतील पासपोर्ट साईज आकाराचे ०५ फोटो व अधिकृत ओळखपत्र न चुकता सोबत आणावेत.
- वैद्यकिय चाचणी नेमून दिलेल्या दिवशी पूर्ण न झाल्यास त्यास जादा दिवसांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे उमेदवारांना पुरेशा वास्तव्याच्या तयारीने व स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- वैद्यकिय चाचणीच्या वेळी कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- खालील नमूद यादीतील उमेदवारांची वैद्यकिय चाचणीकरीता झालेली निवड ही या कार्यालयास प्राप्त झालेल्या चारित्र्य पडताळणी व समांतर आरक्षण पडताळणी अहवालांच्या आधारे करण्यात आलेली आहे. ज्या उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी अहवाल/समांतर आरक्षण पडताळणी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत अशा उमेदवारांची नावे सदर यादीमध्ये समाविष्ट केलेली नाहीत. सदरचे अहवाल या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर उर्वरित उमेदवारांना पुढील वैद्यकिय चाचणीच्या तारखेस बोलाविण्यात येईल.
- गुन्हा दाखल असलेल्या/दाखल गुन्हयातून निर्दोष सुटलेल्या उमेदवारांची शासन सेवेत नियुक्ती करावी अगर कसे याबाबतचा निर्णय घेण्यासाठी त्यांचे प्रकरण दि.१९/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठीत केलेल्या विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहे. उच्चस्तरीय समितीच्या निर्णयानुसार वैद्यकिय चाचणीबाबत व नियुक्तीबाबत संबंधित उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठाणे शहर पोलीस शिपाई भरती २०१९
वैद्यकिय चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी

Sr. No.	CHEST NO.	CANDIDATE NAME	GENDER	MEDICAL DATE
1	2395	NUTAN DILIP SHINDE	FEMALE	20-06-2022
2	1312	PRADIP PRAKASH TANWAR	MALE	20-06-2022
3	1922	KISHOR YASHWANT SHIRKE	MALE	20-06-2022
4	2136	AJIT ASHOK KADAM	MALE	20-06-2022
5	1449	SANTOSH KISAN DHONDE	MALE	20-06-2022
